पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/८/कावि/८३१/२०१३
दिनांक- २/०८/२०१३

प्रति,

मा.........................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा दिनांक ६/८/२०१३ रोजी आयोजित केले बाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक ६/८/२०१३ रोजी सकाळी ११.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
कार्यपत्रिका क्रमांक-७२

दिनांक- ६.८.२०१३ वेळ- सकाळी ११.00 वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक ६/८/२०१३ रोजी सकाळी ११.00 वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

**अ)** दिनांक २३/७/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक-७०) सभावृत्तांत कायम करणे.

ब) दिनांक ३०/७/२०१३ व ३१/७/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक-७१) सभावृत्तांत कायम करणे.

**विषय क्र.** १) मुंबई-पुणे रस्ता पिंपरी चौक ते निगडी कर्बस्टोन फुटपाथचा रस्ता दुभाजक इ. देखभाल व दुरुस्ती करणे या कामासाठी सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकात र.रु. ५० लाख तरतुद करणेत आली असुन, सदर कामाचा प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव सादर करणेत आला आहे. त्यामुळे सदर कामावर तरतुद केलेली संपुर्ण रक्कमेची गरज सध्या भासणार नाही. त्यामुळे सदर कामावरील र.रु. ५० लाख मधुन र.रु २० लाख वर्ग करता येणे शक्य असल्याने विशेष योजना पा.क्र. ४६ अ.क्र. १२२ वरील कामातुन र.रु २० लाख फक्त विशेष योजना पा. क्र. ४६ अ.क्र.११५ चे कामासाठी वर्ग करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक ६/८/२०१३ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र. २) मनपाच्या ड प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२०१३-१४ अन्वये, प्रभाग क्र.४४ ते ५१ व ५३ ते ६० मधील स्ट्रॉर्म वॉटर चेंबर्स साफ करून गाळाची वाहतुक करणेकामी मे.सिध्दीविनायक ट्रान्सपोर्ट (नि.र.रू. ५,९३,७०९/- (र.रू.पाच लाख त्र्यान्नव हजार सातशे नऊ) पेक्षा १९.००**%** कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र. ३) मनपाच्या वाहनदुरुस्ती कार्यशाळाकडील नि.नो.क्र.०१/२०१३-१४ अन्वये, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडे असलेले जे.सी.बी. यंत्रणा दुरुस्ती करणेकामी एजन्सी निश्चित करणेकामी नि.नो.क्र.१/२०१३-१४ प्रसिध्द करणेत आली होती. त्यामध्ये मे.शामराव गॅरेज, वाकड यांचे दर सर्वात कमी असलेने प्रस्तावा सोबत जोडलेल्या अ नुसार लेबर चार्जेस व स्पेअर पार्टच्या दरामध्ये त्यांचेकडून करारनामा करून घेऊन ऑगस्ट २०१४ पर्यंत दुरुस्तीची कामे करून घेणेकरिता येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

(निविदा र.रू.४,००,०००/-)

विषय क्र. ४) मनपाचे JNNURM-EWS प्रकल्पास विजपुरवठा करणेसाठी भोसरी येथील 220/22 KV क्षमतेच्या विजग्रहण केंद्रामध्ये बे-ब्रेकर उभारणीच्या कामाचे शुल्क र.रू. ४५,४१,०००/- म.रा.वि.कंपनीस अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र. ५) मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१४/२०१२-१३ मधील अ.क्र.५ अन्वये, अशुध्द जलउपसा केंद्र रावेत येथील पंपगृहातील टप्पा-३ व ४ अंतर्गत पंपींग मशिनरीची वार्षिक पध्दतीने देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.एक्सेल इलेक्ट्रीकल्स (नि.र.रु.३६,६९,५०७/- (अक्षरी र.रु. छत्तीस लाख एकोणसत्तर हजार पाचशे सात) पेक्षा २.४० % (सुधारित दर) कमी) या ठेकेदाराबरोबर वरील कामाचा करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र. ६) मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१७/२०१२-१३ मधील अ.क्र.३ अन्वये, अशुध्द जलउपसा केंद्र रावेत येथील पंपगृहातील टप्पा-१ ते ४ अंतर्गत उच्चदाब मोटर्स ची दुरुस्ती/रिवायडींग वार्षिक पध्दतीने करणे व अनुषंगिक कामे करणेकामी मे.एक्सेल इलेक्ट्रीकल्स (नि.र.रु. ३९,४२,३५६/- (अक्षरी र.रु.एकोणचाळीस लाख बेचाळीस हजार तीनशे छपन्न्) पेक्षा २२.५०% कमी) या ठेकेदाराबरोबर वरील कामाचा करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र. ७) मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील अनधिकृत नळजोड नियमित करणेकामी दिनांक ३० ऑक्टोबर २०१३ पर्यंत नळजोड नियमित करुन घेण्यासाठी अर्ज न केलेल्या अनधिकृत नळजोडधारकांवर नळजोड तोडण्याची तसेच असे निवासी नळजोड नियमित करण्यासाठी तक्त्यातील फक्त दंडाच्या रकमेत दुपटीने (उदा. १५ मिमी साठी र.रु.१५००|- ऐवजी र.रु.३०००|- ) वाढ करणे, व वाणिज्य नळजोड नियमित करण्यासाठी तक्त्यातील दंडासह पाणीपट्टीच्या रकमेत १० टक्के वाढ ( उदा. १५ मिमी साठी र.रु.१८०००|- ऐवजी र.रु.१९८००|- ) करण्यात यावी. तसेच दिनांक ३० एप्रिल २०१३ नंतर अनधिकृत नळजोड नियमित करण्यासाठी प्रस्तावात नमुद तक्त्यातील रकमेच्या दुप्पट रक्कम ग्राहकाने यापूर्वी अदा केलेली असल्यास सदरची जादाची रक्कम अशा ग्राहकाच्या पुढील पाणी बिलात समायोजित करण्यात यावी. अशा ग्राहकांकडे पूर्वीचा पाणी मीटर असू शकतो, तो मीटर सुस्थितीत नसल्यास नवीन मीटर बसविणे तसेच मीटर नसल्यास स्वखर्चाने मीटर बसविणे आवश्यक आहे. मीटर बसविल्यानंतरच अशा ग्राहकांची नोंद मीटर क्रमांकासह संगणक प्रणालीत करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र. ८) मनपाचे नागरवस्ती विभागाकडील विविध योजनांच्या डाटा एंन्ट्री संगणकावर करून घेणेकामी मे.शुभम उद्योग यांना ५ डेटा एंन्ट्री कॉम्प्युटर ऑपरेटर २ महिन्याकरिता र.रू.७,६६३.१८ (र.रू.सात हजार सहाशे त्रेसष्ट पैसे अठरा) या दराने व थेट पध्दतीने पुरविणेकामी व त्यापोटी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र. ९) मनपाच्या ड प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.२/२०१३-१४ अन्वये, ड प्रभाग कार्यक्षेत्रातील नाले साफ करून गाळाची वाहतुक करणेकामी मे.सिध्दीविनायक ट्रान्सपोर्ट (नि.र.रू.९,९०,७७०/- (र.रू.नऊ लाख नव्वद हजार सातशे सत्तर) पेक्षा सु.दर १०.०० %

कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.१०) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२८/२०१२-१३ मधील अ.क्र.६ अन्वये, प्राधिकरण से.क्र.२६ मधील तळ्या शेजारील वीर सावरकर उद्यानातील उर्वरित कामे करणेकामी मे.यशक असोसिएट्स (नि.र.रु. ९३,३७,०४६/- (अक्षरी र.रु.त्र्यान्नव लाख सदोतीस हजार शेहचाळीस) पेक्षा २७.५४ % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु. ७१,०३,९०५/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे बाजारभावानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.११) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२८/२०१२-१३ मधील अ.क्र.२ अन्वये, ड प्रभागातील उद्यानाचे स्थापत्य व उद्यान विषयक नुतनीकरणाची कामे करणेकामी मे.दृष्टी कन्स्ट्रक्शन (नि.र.रु. १,१७,७३,३२०/- (अक्षरी र.रु.एक कोटी सतरा लाख त्र्याहत्तर हजार तीनशे वीस) पेक्षा १५.९९ % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१,०३,८५,३०४/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे बाजारभावानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१२) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२६/२०१२-१३ मधिल अ.क्र. ३५ अन्वये, वॉर्ड क्र.८१ मधील उर्वरीत रस्त्याचे डांबरीकरण करणेकामी मे.एच.सी. कटारीया (नि.र.रु.२३,२०,२२३/- (अक्षरी र.रु.तेविस लाख वीस हजार दोनशे तेवीस) पेक्षा १७.६० % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु. २०,०७,४५७/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे बाजारभाव कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.१३) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२६/२०१२-१३ मधिल अ.क्र.४४ अन्वये, वॉर्ड क्र.९० येथे रस्त्यावरील खड्डे क्रॉस कट हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरणाने दुरुस्ती करणेकामी मे.एच.सी. कटारीया (नि.र.रु.१०,८३,०९९/- (अक्षरी र.रु.दहा लाख त्र्याऐंशी हजार नव्यान्नव) पेक्षा १७.६० % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.९,३७,०९७/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे बाजारभाव कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.१४) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२८/२०१२-१३ मधिल अ.क्र.१ अन्वये, स.नं.१० सांगवी येथील संत गोरा कुंभार उद्यानाचे नुतनीकरण करणे कामी मे.रिगल कन्स्ट्रक्शन (नि.र.रु.१५,८६,९१६/- (अक्षरी र.रु.पंधरा लाख शहाऐंशी हजार नऊशे सोळा) पेक्षा १५.०० % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१४,१६,३२३/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे बाजारभाव कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.१५) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२६/२०१२-१३ मधिल अ.क्र.२२ अन्वये, काळेवाडी वॉर्ड क्र.७९ विष्णूराज कार्यालय परिसरात हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी मे.एच.सी.कटारीया (नि.र.रु.२३,२०,२२३/- (अक्षरी र.रु.तेविस लाख वीस हजार दोनशे तेवीस) पेक्षा १७.६० % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.२०,०७,४५७/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तीनही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.१६) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२६/२०१२-१३ मधिल अ.क्र.४३ अन्वये, काळेवाडी वॉर्ड क्र.८० राजवाडेनगर परिसरात हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी मे.एच.सी.कटारीया (नि.र.रु.२३,२०,२२३/- (अक्षरी र.रु.तेविस लाख वीस हजार दोनशे तेवीस) पेक्षा १७.६० % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.२०,०७,४५७/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तीनही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र. १७) अतिक्रमण व अनाधिकृत बांधकाम निर्मुलनासाठी नेमण्यात आलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे माहे सन १९९९ ते मे २००९ या कालावधीची पोलीस संरक्षण खर्चा पोटी देयकाची थकीत वेतनाची रक्कम रू.१,८२,९४१६१/- (अक्षरी एक कोटी ब्याअंशी लाख चौ-यान्नव हजार एकशे एकसष्ठ रुपये फक्त)अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१८) मा.शहर सुधारणा समिती सभा दि. १७/०७/२०१३ ठराव क्र.२१ नुसार, पिंपरी चिंचवड मनपा हद्दीमधील काही प्रमुख रस्त्यांवर फ्लायओव्हरखाली व वाहनतळांच्या जागांवर दुचाकी व चारचाकी वाहनांकरीता पे & पार्क योजना राबविणे आवश्यक आहे. याकरीता पिं.चिं.मनपा हद्दीतील भोसरी फ्लायओव्हर,निगडी फ्लायओव्हर,चाफेकर चौक फ्लायओव्हर, क्रोमा शोरुम शेजारील जागा या ठिकाणी पे & पार्क योजना राबविणेचे नियोजन आहे. याकामी पुणे मनपा कडील पे & पार्क च्या दरांचा अभ्यास केला असुन त्यांचेकडील दर पिं.चिं.मनपा क्षेत्रातही लागु केल्यास सुसूत्रता राहील असे वाटते. त्यानुसार पे & पार्क चे शुल्क (Telescoping Parking Charges) पुढीलप्रमाणे सुचविणेत येत आहे.

१) रस्त्यावरील वाहनतळ

अ) दुचाकी वाहनांकरिता -

पहिल्या एक तासापर्यंत – र.रु.३/-

१ तासापुढील कालावधीसाठी – र.रु.४/- प्रति/तास

ब) चारचाकी वाहनांकरीता -

प्रत्येक तासाकरिता – र.रु. १०/-

२) मनपामार्फत तसेच विकास आराखडयातील तरतुदीनुसार विकसित केलेले वाहनतळ /फ्लायओव्हर खालील वाहनतळ

अ) दुचाकी वाहनांकरिता –

पहिल्या एक तासापर्यंत – र.रु.२/-

१ तासापुढील कालावधीसाठी र.रु.३/-प्रति/तास

फक्त रात्री ९ ते सकाळी ८ या कालावधीसाठी मासिक पास शुल्क र.रु. १५०/-

ब) चारचाकी वाहनांकरिता -

प्रत्येक तासाकरिता – र.रु.१०/-

फक्त रात्री ९ ते सकाळी ८ या कालावधीसाठी मासिक पास शुल्क र.रु. ४५०/-

विद्यार्थ्यांसाठी मनपामार्फत देण्यात येत असलेल्या अन्य सवलतीचे धोरणांनुसार विद्यार्थ्यांना पार्किंग सवलत देऊन त्यांना त्यांचे शाळेचे /कॉलेजचे ओळखपत्र व वाहन परवाना सादर केल्यास त्यांना दरमहा र.रु. १००/- याप्रमाणे पार्किंग शुल्क आकारावे. तसेच सदर पे & पार्क योजनेअंतर्गत दूचाकी व चारचाकी वाहनांकरिता ३ वर्ष कालावधीसाठी ठेका देणेसंदर्भातील अटी व शर्ती प्रस्तावा सोबत जोडलेल्या प्रपत्राप्रमाणे आहेत.सदरचे पे & पार्क योजनेच्या प्रस्तावित दरास मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१९) मा. क्रिडा समितीची सभा दि.१७/०७/२०१३ रोजी ठराव क्र.१२ नुसार, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, पुणे जिल्हा कॅरम असोसिएशन यांच्या मान्यतेने व नवप्रगती मित्र मंडळ, इंदिरानगर,चिंचवड, पुणे ३३ यांचे सहकार्याने दिनांक २९ ते ३१ जुलै २०१३ या काळात सकाळी ९.०० ते रात्री ८.०० या वेळात महापौर चषक जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धा आयोजित करणेस व त्या कामी येणा-या र.रु.२,००,०००/- च्या खर्चास मान्यता घेणे व कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन प्राप्त झालेल्या मंजूर दरानुसार ट्रॉफिज स्मृतिचिन्हे,चहा व अल्पोपहार व्यवस्था, पी.व्ही.सी फ्लेक्स बॅनर्स तयार करुन घेणेस व भांडार विभागाकडील निविदा मंजूर दरानुसार निमंत्रणपत्रिका, सर्टिफिकेट्स खरेदी करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२०) मा. क्रिडा समितीची सभा दि.१७/०७/२०१३ रोजी ठराव क्र.१४ नुसार, पिंपरी चिंचवड महानगरपालिका व जिल्हा क्रीडा परिषद पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दिनांक ६/७/२०१३ रोजी सकाळी १०.०० ते ३.०० या वेळात आचार्य अत्रे रंगमंदीर, पिंपरी १८ येथे शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१३-१४ अनुषंगाने नियोजन सभा आयोजित केलेली होती. सदर सभेस चहा व अल्पोपहाराची व्यवस्था करणे आवश्यक होते. सदर

सभा अनुषंगाने सभेस चहा व अल्पोपहाराची व्यवस्था करणेकामी क्रीडा विभागाकडील कोटेशन नोटीस क्रमांक क्रीडा/३/कावि/२६३/२०१३ दिनांक ८/७/२०१३ अन्वये ईच्छुक पुरवठाधारकांकडुन सामोसा व चहा चे दर मागविणेकामी कोटेशन नोटीस महापालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द केलेली होती. त्यानुसार एकुण ०३ पुरवठाधारकांनी सदर चहा व अल्पोपहाराची दरपत्रके सादर केलेली आहेत. त्यामध्ये मे न्यु वैशाली स्वीट्स संत तुकाराम नगर पिंपरी पुणे यांनी अल्पोपहाराची व्यवस्था करणेकामी सर्वात लघुत्तम दरपत्रक सादर केल्याने त्यांना सामोसा ६०० नग व ३०० कप पुरवठा करणेकामी कामाचे आदेश दिले होते. मे.न्यु वैशाली स्वीट्स,पिंपरी यांनी शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१३ – १४ अनुषंगाने आयोजित केलेल्या सभेस उपस्थित राहिलेल्या मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक यांचेकरीता सामोसा ६०० नग व ३०० कप चहा पुरविलेबाबत त्याकामी आलेल्या र.रु.७,६८०/- चे खर्चास मान्यता व सदरचे बील मे.न्यू वैशाली स्वीट्स,पिंपरी यांना अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२१) मा. क्रिडा समितीची सभा दि.१७/०७/२०१३ रोजी ठराव क्र.१६ नुसार, पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने कै.अण्णासाहेब मगर स्टेडियम, नेहरुनगर येथे २९ ऑगस्ट २०१३ क्रीडा दिना निमीत्त जलतरण स्पर्धा आयोजित करणेस व स्पर्धा अनुषंगाने सहभागी खेळाडुंना प्रमाणपत्रे व विजयी खेळाडुंना पुष्पगुच्छ व ट्रॉफिज खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे र.रु. २०,०००/- (अक्षरी र.रु.वीस हजार फक्त) चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२२) मा. क्रिडा समितीची सभा दि.१७/०७/२०१३ रोजी ठराव क्र.२१ नुसार, पिंपरी चिंचवड मनपा च्या ३ व्यायामशाळा सेवाशुल्क तत्वावर चालविणेस दिलेल्या असुन त्या कायम बंद असतात, तसेच त्या ठिकाणी अस्वच्छता नेहमी असते. त्यामुळे नागरीकांची गैरसोय होत असल्याने सदर व्यायामशाळा मनपाच्या ताब्यात घेऊन मनपा मार्फत चालविणे आवश्यक आहे. तरी प्रस्तावात नमुद प्रमाणे सेवाशुल्क तत्वावर चालविणेस दिलेल्या ३ व्यायामशाळेची मुदत संपुष्टात आल्याने त्यांचा ताबा मनपाकडे घेण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२३) मा. क्रिडा समितीची सभा दि.१७/०७/२०१३ रोजी ठराव क्र.२३ नुसार, पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने प्रभाग क्र.५५ पिंपळे सौदागर येथील क्रीडांगणावर महापौर चषक राज्यस्तर कबड्डी स्पर्धा २०१३ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे र.रु.३५ लाख ( अक्षरी र.रु. पस्तीस लाख फक्त) चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२४) यशवंतराव चव्हाण रुग्णालयातील ३०० KVA क्षमतेच्या दोन्ही जनरेटरचे वार्षिक देखभाल दुरुस्तीचे उत्पादित कंपनीची अधिकृत सेवा देणारी एजन्सी मे. ट्रायडेंट सर्विसेस प्रा. लि., पुणे यांचे कडून दि. १/०८/२०१३ ते दि. ३१/०७/२०१४ या कालावधीकरीता करारनामा न करता करवून घेणेस व त्याकामी AMC चार्जेस सर्व करांसह र.रु.७४,७७६/- (र.रू.चौ-याहत्तर हजार सातशे शहात्तर) इतकी रक्कम आगाऊ अदा करणेस व प्रत्यक्ष देखभाल दुरुस्तीकरीता लागणा-या सुट्या साहित्यापोटी येणारा खर्च त्या त्या वेळी वेगळा अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२५) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ शेड्युल चॅप्टर ५(२) नुसार निविदा न मागविता करारनामा न करता तातडीची बाब म्हणुन मनपास आवश्यक वेगवेगळ्या प्रकारच्या बॅट-या मे.एक्साईड इंडस्ट्रीज लि. पुणे या उत्पादीत कंपनीकडुन उपलब्ध तरतुद र.रु.१५,००,०००/- मध्ये आवश्यकतेनुसार टप्याटप्याने थेट खरेदी करणेसच व येणा-या खर्चास एकुण रु.रु १२,७०,५९३/-चे खर्चास मान्यता घेणेकामी व सदरची रक्कम मे.एक्साईड इंडस्ट्रीज लि.पुणे यांना टप्याटप्यामध्ये आगाऊ स्वरुपात अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२६) उदयान विभागाचे सन २०१२-१३ चे अंदाजपत्रकामध्ये उदयान विभागाची कामे देखभाल व ठेकेदारी पध्दतीने करणे या लेखाशिर्षावर शिल्लक र.रू.७८,२०,३२५/- तरतूदीमधून र.रू.५,४६,०००/- उदयाना मध्ये उदयानामध्ये बेंचेस खरेदी या लेखाशिर्षावर वर्ग करणेस कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२७) मनपाच्या रूग्णालयातील एक्स-रे विभागाकरीता आवश्यक लागणा-या कोनिका मेक सी.आर.फिल्म हे साहित्य खरेदीकामी मे.मेडिऑन हेल्थ केअर प्रा.लि. यांनी ई-निविदा प्रणाली अंतर्गत सादर केलेल्या लघुत्तम दरानुसार (कमी करून दिलेल्या दरानुसार) ***C.R.Film* ८ * १० *cm* = १५० * ५,१००/- = र.रू.७,६५,०००/-, *C.R.Film* ११ * १४ *cm* = १०० * ८,५१०/- = र.रू.८,५१,०००/- व *C.R.Film* १४ * १७ *cm* = ५० * १२,६२०/- = र.रू.६,३१,०००/- असा एकूण र.रू.२२,४७,०००/- चे खर्चास करारनामा करून व अनामत रक्कम घेवून निविदेत नमुद केलेनुसार पुढील दोन वर्षाकरीता रूग्णालयाकडून प्राप्त झालेल्या मागणीनुसार प्राप्त झालेल्या लघुत्तम ई-निविदा दरानुसार खरेदी करण्यास व येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२८) पिंपरी-चिंचवड शहराचे प्रगती दर्शविणारे गौरव गीताची ध्वनीफित तयार करण्याचे नियोजन आहे. सदरचे काम करून घेण्यासाठी विद्युत विभागाकडील महसूली खर्चा मधील स्ट्रिटलाईट बिल (उपयोगात आणलेल्या विजेचा खर्च) या लेखाशिर्षावर सन २०१३-१४ मध्ये करणेत आलेली र.रू.१७,००,००,०००/- मधून र.रू.५.०० लक्ष एवढी रक्कम विद्युत विभागाकडील महसुली खर्चामधील संगीत अकादमी स्वरसागर व स्वरसागर पुरस्कार या लेखाशिर्षावर वर्ग करून खर्च करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२९) उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.९/२/२००९-१० नुसार ड प्रभागातील मनपाचे विविध उद्याने देखभाल व संरक्षण करणेकामी ३ (तीन) वर्ष कालावधीनुसार उर्वरीत र.रू.१२,५७,७२४/- (मे २०१३ अखेर) चे प्रत्यक्ष खर्चास कार्योत्तर व पुढील निविदा प्रकीया अंतीम होई पर्यंतच्या मुदतवाढ कालावधीत होणा-या प्रत्यक्षात खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३०) उद्यान विभागाकडील नि.क्र.९/१-२००९/१० ब प्रभागातील मनपाचे विविध उद्याने देखभाल व संरक्षण करणेकामी ३ (तीन) वर्ष कालावधीनुसार उर्वरीत र.रू.३४,३६,९२३/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता व पुढील निविदा प्रक्रिया अंतीम होई पर्यंतच्या मुदतवाढ कालावधीत येणारे प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३१) उद्यान विभागाकडील नि.क्र.१/(१-अ)२००९/१० अ प्रभागातील मनपाचे विविध उद्याने देखभाल व संरक्षण करणेकामी ३ (तीन) वर्ष कालावधीनुसार उर्वरीत र.रू.८७,२३,८४८/- (मे २०१३ अखेर) चे खर्चास कार्योत्तर व पुढील निविदा प्रक्रिया अंतीम होई पर्यंतच्या मुदतवाढ कालावधीतील प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३२) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२८/२०१२-१३ मधिल अ.क्र.३ अन्वये, चिंचवड येथिल आरक्षण क्र.२२२ येथे कंपाउंड वॉल व उदयान विकासाची कामे करणेकामी मे.सोहम कन्स्ट्रक्शन ( नि.र.रु.८,६८,१२४/- (अक्षरी र.रु.आठ लाख अड्डसष्ठ हजार एकशे चोविस) पेक्षा २५.९०% कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.६,७५,४४४/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे बाजारभावानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.३३) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२८/२०१२-१३ मधिल अ.क्र.८ अन्वये, ब प्रभागातील उदयानामध्ये स्वच्छतागृह बांधणेकामी मे.सिध्दी एंटरप्रायजेस (नि.र.रु.८,६८,३४४/- (अक्षरी र.रु.आठ लाख अड्डसष्ठ हजार तीनशे चव्वेचाळीस) पेक्षा १६.०० % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु. ७,६५,८७९/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे बाजारभावानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.३४) मे.न्यु जॉय स्पोर्टस क्लब, यांनी पुरवठा केलेल्या जीवरक्षकांचे दि. 18/07/2013 रोजी घेतलेल्या चाचणीचा अहवाल मान्यतेसाठी तसेच अपात्र झालेले जीवरक्षकांनी प्रत्यक्षपणे तलावावर कामकाज केलेले असल्याने त्यांचे बील व पात्र असलेल्या जीवरक्षकांचे बील अदायगीस मान्यता मिळणेकामी तसेच निविदेप्रमाणे पुर्ण १ वर्ष कालावधी करीता 18 जीवरक्षक X 8000/-(मान्यदर) = 144000/- प्रतीमहा प्रमाणे 12 महिने X144000/- = 1728000/- चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/८/कावि/८३१/२०१३
दिनांक- २/०८/२०१३

टिप- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.